दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990
लातूर वर्ष ३ रे अंक २८० वा रविवार दि.१६ एप्रिल २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

## सांगलीत अद्यापही वेळ गेलेली नाही

सांगली : सांगलीत काँग्रेसचे इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांनी आज अपक्ष अर्ज भरला आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने सांगलीत परस्पर उमेदवार दिल्याने पाटील समर्थक नाराज झाले असून बंडखोरी करण्याची भूमिका काँग्रेसच्या नेत्यांनी घेतली आहे. यावरून आता जयंत पाटलांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीची भुमिका स्पष्ट केली आहे.सांगलीत



शिवसेना आणि काँग्रेसमध्ये चर्चा सुरू होत्या. त्या चर्चा सुरू असताना आम्ही येऊन बोलणे योग्य नव्हते. सांगलीची जागा काँग्रेस आणि शिवसेनेने मागितली होती. शरद पवारांपासून आम्ही सर्वांनी काँग्रेसला जागा मिळावी, तोडगा निघावा यासाठी प्रयत्न केले. पेटवणारे पेटवत असतात काहींचा यामागे हेतू वेगळा असतो. पेटवणारे एकदा एकत्र आले आणि त्यांच्यामध्ये आले की अवघड होते. मी विशाल पाटील यांच्या संपर्कात आहे असे शरद पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले.सांगलीचा तिढा सुटला पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. काँग्रेस आणि शिवसेनेच्या नेत्यांनी हा विषय बसून संपवावा. ज्यावेळी हा वाद सुरू होता त्यावेळी शरद पवार आणि मी स्वत: वाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. अजून महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी अर्ज भरला नाही. त्यांच्यात खूप काही होऊ शकते. अर्ज मागे घेण्यापर्यंत वेळ आहे असे संकेत पाटलांनी दिले.माझ्या बद्दल ब-याचवेळा काही लोकांनी अपप्रचार केला. महाविकास आघाडीत आम्ही एकत्र बसलो. जागा वाटपात अनेक मतमतांतरे झाली. मलाच काही गोष्टींसाठी जबाबदार धरणे योग्य नाही. मग त्या पक्षाच्या नेत्यांना सुद्धा जबाबदार धरले पाहिजे. माझा त्याच्याशी काय संबंध? जुन्या वादाला काही लोक रंग देण्याचा प्रयत्न करत आहेत. राजकारण करताना पुढला विचार करायचा असतो. राज्य स्तरावर जो निर्णय झाला तो मान्य करून पुढे जायचे असते. या संबंधात जे लोक वावड्या उठवतात त्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे की त्यांच्या पक्षाचे प्रमुख नेते काय करतात असे पाटील म्हणाले.तसेच राजारामबापू पाटील आणि वसंतदादा पाटील हे वरती एकत्रित बसून चहा घेत असतील आणि म्हणत असतील हे काय चालले आहे. आपण एकमेकांना सांभाळून राजकारण केले. समजूतदार राजकारणी होते दोघे. मागे ४० वर्षांपूर्वी काय झाले याच्याशी काही घेणे देणे नाही. इतिहासावर बोलून भविष्याकडे लक्ष जात नाही असा सल्लाही पाटलांनी दिला.

## लोकशाही वाचवण्यासाठी निवडणूक लढवतोय

मुंबई : भाजपा केवळ जाहीरनामे प्रसिद्ध करत राहतील. कारण या निवडणुकीनंतर भाजपा सत्तेत येणार नाही. त्यामुळे त्यांना काही वाट्टेल ते बोलण्याचा अधिकार आहे. वाट्टेल ते बोलण्याचा अधिकार कायम राहावा, म्हणून आम्ही लोकशाही वाचवण्यासाठी निवडणूक लढवत आहोत, असा एल्गार ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला.पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपावर जोरदार टीका केली. तसेच अमित शाह यांनी केलेल्या टीकेचा खरपूस शब्दांत समाचार घेतला. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे उद्धव ठाकरे तसेच शरद पवार यांच्या अपत्य प्रेमामुळे फुटले. भाजपाने पक्ष फोडले नाहीत, या शब्दांत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी हल्लाबोल केला होता. यावर बोलताना, अमित शाह यांना मला सांगायचे आहे की, तुमच्या पुत्रप्रेमामुळे भारत वर्ल्ड कपमधील अंतिम सामना हरला. तसे पुत्रप्रेम मी दाखवलेले नाही. अमित शाह यांचे पक्षातील स्थान काय, असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.काही दिवसांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी मी पुन्हा येईन, असे म्हटले होते. ते दोन पक्ष फोडून आलो, त्यामुळे भाजपाने केलेल्या दाव्यांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. अमित शाह यांची लाज त्यांचेच चेले-चपाटे काढत आहेत. तुमच्या




पुत्रप्रेमामुळे भारत अंतिम सामना हरला, यावर अमित शाह बोलले तर अधिक बरे होईल असे आव्हान उद्धव ठाकरेंनी दिले. दरम्यान, सलमान खानच्या घराजवळ झालेल्या गोळीबार प्रकरणी बोलताना उद्धव ठाकरेंनी महायुती सरकारवर निशाणा साधला. सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. खुलेआम गुंडागर्दी सुरू आहे. राज्यात घटनाबा सरकार आहे. खुलेआम सुरू असलेल्या गुंडागर्दी रोखण्याची हिंमत सरकारमध्ये नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## भाजपने देशाची लूट करून दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर पोहोचविले

गडचिरोली : खोटी आश्वासने, पोकळ वचने देऊन सत्तेत येताच भाजपाने कोलांटी उडी मारली. देशातील प्रत्येक क्षेत्रात प्रचंड लूट माजवून व्यापारी हित जोपासले. आता तर आपकी बार ४०० पारचा नारा देऊन देशाच्या पवित्र संविधानाला बदलून हुकूमशाही आणण्याचा डाव भाजपने आखला आहे. मतदारांनी जागरूक राहून या षडयंत्राला उत्तर देण्यासाठी सज्ज व्हावे. येत्या १९ एप्रिलला इंडिया आघाडीच्या उमेदवाराला विजयी करावे, असे आवाहन राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. ते गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेव किरसान यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते. यावेळी विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरातही उपस्थित होते.विजय वडेट्टीवार म्हणाले, देशात, बेरोजगारी महागाई प्रचंड प्रमाणात फोफावली असून देशातील शेतकरी कामगार कष्टकरी मजूर व सर्वसामान्य यांना जगणे कठीण झाले आहे. चारशे रुपयाचा गॅस बाराशेवर नेला, रासायनिक खते, युरिया याची प्रचंड दरवाढ केली व वजनातही घट केली. तसेच जीएसटीच्या नावावर प्रत्येक वस्तूवर कर आकारून भाजप सरकारने सर्वसामान्यांवर आर्थिक बोजा वाढवला आहे. तर व्यापारी हित जोपासून देशाच्या अर्थव्यवस्थेचे वाटोळे केले. आज देश वाईट परिस्थितीतून जात असून या देशात महिला अत्याचार गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. आता या भाजप सरकारचा देशात धर्मांधता पसरवून देशाचे संविधान बदलविण्याचा डाव आहे. गेल्या दहा वर्षांत खासदार म्हणून अशोक नेते



यांनी लोकोपयोगी कुठले कार्य केले काय..?खासदार अशोक नेते हे आजवर सर्वसामान्यांच्या समस्या संसदेत मागण्याऐवजी 'मौनी बाबा' बनले त्यासाठी त्यांना उत्कृष्ट संसद रत्न हा पुरस्कार मिळाला काय असा खोचक टोला देखील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी लगावला. देश संकटात आहे. आता देशाला वाचविण्याची जबाबदारी तुम्हा आम्हा सर्वांवर आहे म्हणून येत्या १९ एप्रिल रोजी या हुकूमशाही सरकारला सत्तेतून पायउतार करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून मतदानाच्या प्रक्रियेतून इंडिया आघाडीच्या उमेदवाराला निवडून द्यावे, असे आवाहनही यावेळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले.

## सातत्याने सनातन धर्माचा अपमान

नवी दिल्ली : लोकसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे, त्यामुळे निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीही मॅरेथॉन रॅली आणि जाहीर सभा घेत आहेत. पीएम मोदींनी राम मंदिरापासून ते सनातन, केंद्रीय तपास यंत्रणा आणि इतर मुद्द्यांवरुन विरोधी पक्षांना चांगलेच धारेवर धरले आहे. तामिळनाडूतील द्रमुक नेत्यांनी सनातनवर अनेक विधाने केली, यावर पीएम मोदी म्हणाले की, द्रमुकचा जन्म केवळ द्वेषपूर्ण विधाने करण्यासाठी झाला आहे. द्रमुकविरोधात लोकांमध्ये प्रचंड रोष आहे. त्यामुळे मतदार आता भाजपकडे वळत आहेत. काँग्रेसने द्रमुकला विचारले पाहिजे की, त्यांची एवढी कोणती मजबुरी आहे ज्यामुळे ते सातत्याने सनातन धर्माचा अपमान करत असल्याचे वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदींनी म्हटले. सदर मुलाखत सोमवार दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० मिनिटांनी खासगी वाहिन्यांवर प्रसारीत करण्यात आली होती.त्याचवेळी पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारला की, राम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाचे राजकारण व्हायला नको होते, पण ते झाले. यावर मोदी म्हणाले की, रा मंदिर त्यांच्यासाठी (काँग्रेस) राजकीय शस्त्र आहे. रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्याच्या मुद्यावरही पंतप्रधान मोदींना प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाला उत्तर देताना पीएम मोदी म्हणाले की, दोन्ही राष्ट्रपतींसोबत माझे अतिशय मैत्रीपूर्ण संबंध आहेत.

## पहिल्या टप्प्याच्या मतदानापूर्वी मोदींचा १०० दिवसांचा प्लॅन तयार

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचा प्रचार शीगेला पोहचला आहे. सर्व पक्षांचे नेते विविध ठिकाणी रॅली-प्रचारसभा घेत आहेत. अशातच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एएनआय वृत्तसंस्थेला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी विरोधकांना तुरुंगात पाठवल्याच्या विरोधी पक्षांच्या आरोपांचे खंडन करत म्हटले की, अंमलबजावणी संचालनालयाने नोंदवलेले बहुतांश खटले अशा व्यक्ती आणि संस्थांविरुद्ध आहेत ज्यांचा राजकारणाशी काहीही संबंध नाही. प्रामाणिक व्यक्तीला घाबरण्याचे कारण नाही, परंतु भ्रष्टाचारी लोकांना सोडले जाणार नाही. यासोबतच त्यांनी तिस-या टर्मची तयारी सुरू असून १०० दिवसांच्या योजना तयार असल्याचा दावाही केला.मोदी आपल्या प्रत्येक भाषणात २०२४ नाही, तर २०४७ लक्ष्य असल्याचे सांगतात. याबाबत बोलताना ते म्हणाले की, माझ्याकडे २५ वर्षांचे व्हिजन आहे. जेव्हा देश स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर अमृत महोत्सव साजरा करत होता, त्यावेळी मी हा विषय सर्वांसमोर ठेवायला सुरुवात केली. २०४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळून १०० वर्षे पूर्ण होतील, साहजिकच हा टप्पा खुप मोठा आहे. या येणा-या २५ वर्षांचा सदुपयोग कसा करावा, हे प्रत्येकाने निश्चित केले पाहिजे. तिस-या टर्मबाबत बोलताना मोदी म्हणाले, यासाठी आमचा १०० दिवसांचा प्लॅन तयार आहे. अजून देशासाठी खूप काही करायचे आहे. आपल्या देशाला अजून किती आणि कशाची गरज आहे, हे मी जाणतो. म्हणूनच मी नेहमी म्हणतो की, जे झाले ते ट्रेलर आहे, अजून खूप बाकी आहे. निवडणुकीला सामोरे जाण्यापूर्वीच



मी याबाबत नियोजन सुरू केले होते. २०४७ डोळ्यासमोर ठेवून मी गेली दोन वर्षे काम करत आहे. येत्या २५ वर्षात देश कसा असावा, याबाबत मी देशातील सुमारे १५ लाख लोकांकडून सूचना घेतल्या. पुढील २५ वर्षांच्या व्हिजनसाठी प्रत्येक विभागात अधिका-यांची टीम तयार केली. एक व्हिजन डॉक्युमेंट आम्ही तयार करत आहोत. निवडणूक झाल्यानंतर निती आयोगाची बैठक बोलावून सर्वसमावेशक चर्चा केली जाईल. निवडणुका संपल्याबरोबर सर्व राज्यांनी यावर काम करावे असेही मोदी यावेळी म्हणाले.मोदी पुढे म्हणाले, २०१९ च्या निवडणुकीतही मी १०० दिवसांचे काम घेऊन मैदानात उतरलो होतो. आमची पुन्हा सत्ता आली, तेव्हा पहिल्या १०० दिवसांत कलम ३७० रद्द केली, पहिल्या १०० दिवसांत मुस्लिम महिलांना तिहेरी तलाकपासून मुक्त केले. सुरक्षेसंदर्भातील यूएपीए विधेयक १०० दिवसांत मंजूर झाले. बँकांचे विलीनीकरण हे मोठे काम होते, ते आम्ही १०० दिवसांत पूर्ण केले. एवढेच नाही तर, मी जवळपास १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करुन जनावरांच्या लसीकरणासाठी मोठी मोहीम राबवली. हे सर्व मी पहिल्या १०० दिवसात केले. त्यामुळे १०० दिवसांत मला कोणते काम करायचे, याचे नियोजन मी आधीच करतो.

## बेळगावातील काँग्रेसच्या रॅलीमध्ये डी. के. शिवकुमार, धिरज देशमुख सहभागी

### काँग्रेसचे उमेदवार मृणाल हेब्बाळकर यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन

बेळगाव : बेळगाव लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार मृणाल हेब्बाळकर यांच्या प्रचारार्थ बेळगाव येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने निघालेल्या रॅलीमध्ये कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख सहभागी झाले होते. मृणाल हेब्बाळकर यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. बेळगाव लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार मृणाल हेब्बाळकर यांनी आपला उमेदवारी अर्ज सोमवारी (ता. १५) दाखल केला. त्यानंतर अलोट जनसमुदायाच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, सार्वजनिक बांधकाम मंत्री सतीशण्णा जारकीहोळी, महिला व बालकल्याण मंत्री लक्ष्मी हेब्बाळकर, आमदार धिरज देशमुख, आमदार प्रकाशन्ना



हुक्केरी, आमदार लक्ष्मण अण्णा सवदी, आमदार अशोक अण्णा पट्टणा, आमदार राजू अण्णा कागे, आमदार महंतगंगा काळे, आमदार बाबासाहेब पाटील, आमदार विश्वास वैद्य, आमदार राजू सेठ, आमदार चन्नराजा हत्तीहोळी, अशोक पुजारी, महांतेश काडाडी लक्ष्मणराव चंडे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार म्हणाले, या रॅलीमध्ये सहभागी झालेला प्रचंड जनसमुदाय काँग्रेस उमेदवाराच्या विजयाचा पुरावा आहे. बेळगाव आणि सर्वच ठिकाणी काँग्रेस पक्षाला आपण सर्वांनी बळ द्यावे. आमदार धिरज देशमुख म्हणाले, देशातील वाढती महागाई, वाढती बेरोजगारी याला जनता कंटाळली आहे. त्यामुळे देशात काँग्रेस पक्ष सत्तेत येणे गरजेचे आहे. यासाठी काँग्रेस पक्षाचे उमेदवार मृणाल हेब्बाळकर यांना आपण भरभरून आशीर्वाद देवून विजयी करावे.

## माजी आमदार विलासराव जगतापांचा विशाल पाटलांना पाठिंबा

सांगली : सांगली लोकसभा मतदारसंघात उमेदवारीवरुन महाविकास आघाडीत तिढा वाढला आहे. काँग्रेसच्या विशाल पाटील यांनीही उमेदवारीवर दावा केला आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये सांगलीची जागा ठाकरे गटाला मिळाली असून ठाकरे गटाने पैलवान चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. विशाल पाटील यांनी आता अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी केल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, आता सांगली भाजपमधील नाराजी समोर आली आहे. जतचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी विशाल पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे.यामुळे आता भाजपाला सांगली लोकसभा मतदारसंघात झटका बसला आहे. या पाठिंब्यामुळे खासदार संजयकाका पाटील यांच्या अडचणी वाढल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून माजी आमदार विलासराव जगताप यांनी खासदार संजयकाका पाटील यांच्या उमेदवारीवरुन नाराजी व्यक्त केली होती. दरम्यान, आज माजी आमदार विलासराव जगताप यांनी विशाल पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. आज पत्रकार परिषद घेऊन भाजपाचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी विशाल पाटील यांना पाठिंबा जाहीर केला. आज माजी आमदार जगतापराव यांनी भाजपाला सदस्यत्वाचा राजीनामाही दिला आहे. यावेळी बोलताना माजी आमदार विलासराव जगताप म्हणाले, स्वाभिमानी कार्यकर्त्यांची मी बैठक घेतली. या बैठकीत मी त्यांची बाजू ऐकून घेतली. सर्वानुमते मी स्वत: विशाल पाटील यांना पाठिंबा देण्याचे धोरण जाहीर केले आहे. विशाल पाटील यांच्यासाठी कार्यकर्ते मनापासून काम करतील. यापुढे विशाल पाटील यांच्यासाठी ताकदीने काम करण्याचे कार्यकर्त्यांनी मान्य केले आहे असेही माजी आमदार विलासराव जगताप म्हणाले.वंचितनेही दिला पाठिंबा दोन दिवसांपूर्वी वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनीही विशाल पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तर दुसरीकडे आज जगताप यांनीही पाठिंबा जाहीर केला आहे. विशाल पाटील यांनी लोकसभेचे दोन अर्ज घेतल्याचे बोलले जात आहे, यामुळे पाटील आता ही लोकसभा अपक्ष लढवणार असल्याची चर्चा सुरू आहे. माजी आमदार विलास जगताप हे जतचे माजी आमदार आहेत. जत तालुक्यात त्यांचा मोठा गट आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# मस्क भारतात!

लोकसभा निवडणुकांमध्ये भावनात्मक मुद्द्यांपेक्षा बेरोजगारी आणि महागाई हे दोन प्रश्न लोकांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे बनले आहेत, असा निष्कर्ष नुकताच एका प्रथितयश जनमत चाचणी संस्थेने काढला आहे. बेरोजगारीच्या ज्या समस्येने युवक त्रस्त आहेत, त्यावर केंद्र सरकार मौन बाळगत असल्याची टीका विरोधी पक्षांकडून होणे साहजिक आहे. रोजगारनिर्मितीच्या प्रयत्नांना गती देण्याची आवश्यकता त्यातून आधीच अधोरेखित झाली आहे. गरज आहे ती केवळ सरकारी कार्यालयांमध्ये भरती करण्यापेक्षा खासगी क्षेत्रात कुशल हातांना काम कसे मिळेल आणि उच्च गुणवत्तेच्या नोकर्या कशा मिळतील, यावर लक्ष केंद्रित करण्याची.सरकारने पायाभूत क्षेत्रातून नवे रोजगार निर्माण करण्यासाठी दीर्घकालीन धोरणही आखले. त्याची फळे येण्यास विलंब लागतो आहे. त्याच धोरणाचे सकारात्मक परिणाम लक्षात घेता देशात उद्योगाची नवनवीन क्षेत्रे उदयास येत आहेत. या पार्श्वभूमीवर २०४७ पर्यत मध्यमवर्गीय कुटुंबे आणखी प्रगती करतील, अशा प्रकारे देशाचा विकास करण्याचा सरकारचा प्रयत्न असेल. कागदपत्रांच्या जंजाळात अडकलेले सरकारी कामकाज बाहेर काढून उद्योजकतेला प्रोत्साहन द्यायला हवे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच केले आहे. आता इलेक्ट्रिक वाहनांची (ईव्ही) भारतात अधिकाधिक निर्मिती व्हावी, त्यामधून पर्यावरणाचेही संवर्धन व्हावे आणि तरुणांना नोकर्याही मिळाव्यात, असे सरकारचे हे धोरण.'टेस्ला' या कंपनीचे सर्वेसर्वा आणि जगद्विख्यात उद्योगपती एलॉन मस्क या आठवड्यात भारताच्या पंतप्रधानांची भेट घेण्यासाठी येण्याची शक्यता आहे. त्याचवेळी टेस्लाकडून देशात गुंतवणूक आणि नवीन उत्पादन सुरू करण्याच्या योजनांबाबत घोषणा केली जाईल, अशी अपेक्षा आहे. मोदी यांनी गेल्या वर्षीच्या जूनमध्ये अमेरिकेत मस्क यांची भेट घेतली होती. या दौर्यात मस्क उत्पादन प्रकल्पासाठी संभाव्य जागेची चाचपणीही करणार आहेत. टेस्ला आणि मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्स इंडस्ट्रीजशी महिनाभरापेक्षा अधिक काळापासून त्यांची चर्चा सुरू आहे. पूर्णपणे वाहननिर्मिती क्षेत्रात उतरायचे नाही, तर देशात विजेवर चालणार्या वाहनांसाठी परिसंस्था तयार करणे, हे रिलायन्सच्या संयुक्त उपक्रमाचे उद्दिष्ट असणार आहे.गेल्या वर्षी रिलायन्सने अशोक लेलँडशी संयुक्त भागीदारी करून भारतातील पहिला ग्रीन हायड्रोजन इंधनावर चालणारा ट्रक लाँच केला, तेव्हाच विद्युत वाहनांसाठी काढता येण्याजोग्या आणि बदलण्यायोग्य बॅटरीचे अनावरणही केले होते. आता टेस्लाने भारतात प्रकल्प उभारण्यासाठी दोन ते तीन अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याचे ठरवले आहे. शिवाय प्रकल्प उभा करण्यासाठी ठिकाण म्हणून महाराष्ट्र आणि गुजरातचे नाव आघाडीवर आहे. हा प्रकल्प देशांतर्गत बाजारपेठ आणि निर्यातीच्या उद्देशाने वापरण्याची योजना आखत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होणार असून, तो कोणत्याही राज्यात आला, तरी त्यामुळे हजारो तंत्रशिक्षित तरुणांना नोकर्या उपलब्ध होण्याची आशा आहे.या नियोजित प्रकल्पासाठी सुटे भाग पुरवणारे अनेक छोटे छोटे पूरक उद्योगही आकारास येऊ शकतील. तसेच हॉटेल्स, वाहतूक, पर्यटन, इस्पितळे अशा अनेक व्यवसाय-उद्योगांना चालना मिळू शकेल. शिवाय या जगद्विख्यात तंत्रसधन कंपनीचा प्रकल्प देशात येणे हे नक्कीच अभिमानाचे आहे. परदेशांतील जे कार उत्पादक गुंतवणूक करून कारखाना उभारतील, त्यांच्यासाठी भारत सरकारने १५ मार्च रोजी एक नवे सवलतीचे धोरण जाहीर केले. विदेशी उत्पादकांना पहिली पाच वर्षे पूर्ण बांधणी केलेल्या इलेक्ट्रिक मोटारी भारतात आयात करता येतील. अर्थात, या मोटारीची किमान किंमत सुमारे २९ लाख रुपये असली पाहिजे. अशा कारवर केवळ १५ टक्के आयात कर लावला जाईल. एरवी, अशा आयात कारवर १०० टक्के आयात कर लावण्यात येतो; परंतु ही सवलत हवी असणार्या विदेशी कंपन्यांना किमान ५० कोटी डॉलर्सची भांडवली गुंतवणूक करून, भारतात उत्पादन सुरू करावे लागेल. टेस्ला सध्या अमेरिकेखेरीज जर्मनी आणि चीनमध्ये विद्युत वाहनांचे उत्पादन करते.ही कंपनी भारतात आल्यास 'मेक इन इंडिया' या उपक्रमास चालना मिळेल. यापूर्वी 'ॲपल'ने भारतात आयफोनची निर्मिती सुरू केली आहे. वास्तविक, सध्या टेस्लाचा खप कमी झाला असून, कंपनीच्या शेअरचे भावही कोसळले आहेत. अमेरिका, युरोप व चीनमध्ये टेस्लाला विविध स्पर्धकांशी चुरस करावी लागत आहे. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार चालू वर्षाच्या पहिल्या तिमाहीत टेस्लाने साडेचार लाख मोटारींची विक्री करावी, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात ३ लाख ८७ हजार कारचीच विक्री झाली. वर्षभरात कंपनीचा नफाही निम्म्यावर आला.टेस्लाने आपला स्वस्त विद्युत वाहनांचा प्रकल्प गुंडाळून ठेवल्याचीही बातमी असल्यामुळे त्याची प्रतिक्रिया शेअर बाजारात उमटली. चीनमधील विद्युत वाहनांची किंमत दहा हजार डॉलर्स एवढीच आहे, तर टेस्लाचे 'मॉडेल थ्री सेडान'ची किंमत अमेरिकेतच ३९ हजार डॉलर्स इतकी आहे; परंतु विनाड्रायव्हर चालवले जाणारे 'रोबोटॅक्सी' हे वाहनही टेस्लातर्फे डिझाईन केले जात आहे. 'सायबर ट्रक' हे इलेक्ट्रिक पिकअप वाहन तयार करण्यासाठीही खूप प्रयोग कंपनीने केले आहेत. मुद्दा असा की, टेस्लासारखी कंपनी भारतात आल्यामुळे तंत्रज्ञान हस्तांतरित होऊन, उद्या देशी कंपन्या या क्षेत्रात प्रवेश करू शकतील.भारतासारखी मोठी बाजारपेठ टेस्लाच्या दृष्टीने फायद्याची आहे; मात्र विद्युत वाहनांच्या क्षेत्रात दीर्घकाळ चीनला टक्कर देण्याच्या दृष्टीने भारताला यासारख्या उद्योगांचा सुरुवातीला उपयोग होणार आहे. कारण, त्यामुळे हे क्षेत्र विकसित होईलच आणि नंतर भारतीय वाहन उत्पादक त्यात शिरकाव करू शकतील. ऑटोमोबाईल क्षेत्रात अन्य उद्योगांपेक्षा जास्त रोजगार तयार होत असतो, हे लक्षात घेतल्यास टेस्लाचे पाऊल देशातील औद्योगिक क्षेत्रातील बदलांना नवी दिशा देणारे ठरेल; मात्र अनेकदा विदेशी कंपन्या सरकारी सवलतींचा लाभ उठवून ठरलेल्या अटींचे पालन करत नाहीत. हा पूर्वानुभव लक्षात घेऊन केंद्र सरकार याबाबतीत जागरूक राहील, ही आशा!

# प्रज्ञावंत शास्त्रज्ञ!

विश्वनिर्मितीचे गूढ हा मानवजातीसाठी कायमच उत्सुकतेचा विषय राहिला आहे. साहजिकच विज्ञानालाही हे गूढ कायम खुणावत राहिले आहे. हे गूढ उकलण्यात अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा ठरलेल्या हिग्ज बोसॉन अर्थात गॉड पार्टिकल म्हणजेच प्रचलित भाषेत 'देवकणा'च्या अस्तित्वाबद्दल सर्वप्रथम शास्त्रीय सिद्धांत मांडणा-या पीटर हिग्ज यांच्या निधनाने भौतिकशास्त्रातील एका प्रज्ञावंत शास्त्रज्ञानाच्या पर्वाची अखेर झाली. या सृष्टीचा कर्ताधर्ता कोण? विश्वाचा हा प्रचंड पसारा कोण व कसा चालवतो? या अथांग विश्वाची सुरुवात व शेवट कुठे आहे? पृथ्वीवरील वा ब्रह्मांडातील सर्व सजीवांच्या अस्तित्वाचा अर्थ काय? अशा कितीतरी अनुत्तरित प्रश्नांनी मानवजातीला हजारो वर्षांपासून ग्रासले आहे. पीटर हिग्ज यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून या गूढ प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा अथक प्रयत्न केला. या प्रयत्नातून १९६० साली त्यांनी प्रथम 'देवकणा'च्या अस्तित्वाबद्दल दावा केला.मात्र, हा दावा शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध होण्यासाठी तब्बल पाच दशकांच्या प्रदीर्घ कालावधीची प्रतीक्षाच करावी लागली. याबाबतच्या संशोधनासाठी स्वित्झर्लंडमध्ये युरोपियन कॉन्सिल फॉर न्यूक्लिअर रिसर्च (सर्न) या संस्थेत संशोधनासाठी भव्य यंत्रणा उभारण्यात आली. जमिनीच्या पोटात खोलवर उभारलेल्या लार्ज हायड्रॉन कोलायडर या प्रयोगात शेकडो शास्त्रज्ञ रात्रंदिवस कार्यरत राहिल्यावर अखेर ४ जुलै २०१२ रोजी देवकणांचे अस्तित्व सिद्ध झाले. २०१३ मध्ये पीटर हिग्ज यांना या शोधाबद्दल भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक जाहीर करण्यात आले होते. विश्वनिर्मितीचे गूढ उकलण्यासाठी मांडल्या गेलेल्या सिद्धांतापैकी महास्फोटाच्या सिद्धांताला सर्वाधिक मान्यता आहे. सुमारे १३७० कोटी वर्षांपूर्वी झालेल्या महास्फोटामध्ये तयार झालेल्या अदृश्य क्षेत्रामध्ये हिग्ज बोसॉन कणांचे म्हणजे देवकणांचे अस्तित्व जाणवले होते. या कणांवर पीटर हिग्ज यांच्यासह सहा वैज्ञानिकांनी संशोधन केले. मात्र, या देवकणांचे अस्तित्व त्यांना सिद्ध करता आले नव्हते. भारतीय वैज्ञानिक सत्येंद्रनाथ बोस यांनी १९२४ मध्ये इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, फोटॉन आदी कणांच्या समूहांचे संख्याशास्त्रीय नियम शोधून काढले होते.त्यांच्या या संशोधनाच्या जोरावरच साठच्या दशकात इलेक्ट्रॉनपेक्षाही सूक्ष्म कणांचा शोध लागू शकला होता. याच संशोधनाचा मुख्य आधार पीटर हिग्ज यांनी देवकणांच्या सिद्धांतासाठी घेतला. त्यावरूनच या कणांना हिग्ज-बोसॉन असे शास्त्रीय नाव प्रदान करण्यात आले. हा देवकण वस्तुमान प्रदान करतो, असा सिद्धांत हिग्ज यांनी १९६४ मध्ये मांडला. या जगात निर्वात, अस्तित्वहीन असे काहीच नाही. जेथे काही नाही असे आपल्याला वाटते तेथेही एक विशिष्ट क्षेत्र असतेच.



त्याला 'हिग्ज फिल्ड' असे संबोधले जाते. हिग्ज यांचा हा सिद्धांत वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाला तेव्हा या प्रयोगाचे सारे श्रेय हिग्ज यांनी तरुण संशोधकांना दिले होते. पीटर हिग्ज यांचा जन्म इंग्लंडमधील न्यू कॅसल इथला. १९२९ मध्ये ते साऊंड इंजिनीअर असणा-या पित्याच्या घरात जन्मले. त्यांचे बहुतांश शालेय शिक्षण ब्रिस्टलमध्ये झाले. १९४१ ते ४६ या काळात कोथम ग्रामर स्कूलमध्ये त्यांना मिळालेले शिक्षण त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे ठरले. 'क्वांटम मेकॅनिक्स'चे पितामह पॉल डॅरेक या शाळेचे माजी विद्यार्थी! पीटर हिग्ज यांना त्यांच्यापासून भौतिकशास्त्राच्या अभ्यासाची प्रेरणा मिळाली. सैद्धांतिक भौतिकशास्त्रात त्यांना विशेष रुची होती. वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी सिटी ऑफ लंडन स्कूलमध्ये गणितात विशेष प्रावीण्य प्राप्त केले आणि प्रतिष्ठित किंग्ज कॉलेज लंडनमध्ये प्रवेश घेतला. तिथूनच त्यांनी भौतिकशास्त्राची पदवी व पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. रॉयल कमिशनकडून त्यांना रिसर्च फेलोशिप देण्यात आली. इम्पिरियल कॉलेज लंडन आणि युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन येथे विविध पदे भूषवून १९६० मध्ये ते एडिंबरो विद्यापीठात परत आले. त्यांचे सर्व महत्त्वाचे संशोधन याच विद्यापीठात घडले.

भौतिकशास्त्रातल्या अनेक महत्त्वाच्या व प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. 'देवकणां'च्या त्यांच्या सिद्धांतावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर त्यांना भौतिकशास्त्राचा नोबेल पुरस्कार २०१३ मध्ये जाहीर झाला. हा पुरस्कार जाहीर होण्यास झालेल्या उशिराबद्दल खंत व्यक्त करताना त्यांनी अत्यंत मिश्किल प्रतिक्रिया दिली होती. '१९८० मध्ये एका स्विडीश मित्राचा मला पुरस्कार मिळाल्याबद्दल फोन आला होता, तेव्हापासून मी पुरस्काराची प्रतीक्षाच करतोय,' अशी टिप्पणी त्यांनी केली होती. अणुकेंद्रामधील कणांबाबत भौतिकशास्त्रात 'स्टँडर्ड मॉडेल' आहे. देवकणांच्या अस्तित्वाची सिद्धता झाली नसती तर हे मॉडेलच चुकीचे ठरले असते. स्वत: नास्तिक असलेल्या पीटर हिग्ज यांना गॉड पार्टिकल हे नाव अजिबात रुचणारे नव्हते. मात्र, त्यांच्या सिद्धांतावर वैज्ञानिक सिद्धतेची मोहर लागल्यावर वैज्ञानिकांनी त्यांचा भव्य सत्कार केल्यावर त्यांच्या रुद्ध कंठातून बाहेर पडलेले पहिले शब्द 'ओह माय गॉड' हे होते. पीटर हिग्ज यांची आणखी एक खासियत म्हणजे ते केवळ प्रयोगशाळेत रमणारे वैज्ञानिक नव्हते. त्यांच्या सामाजिक जाणिवाही अत्यंत प्रखर होत्या. विद्यापीठात शिक्षक संघटनांच्या आंदोलनात ते आघाडीवर असायचे. लंडन आणि नंतर एडिंबरोमध्ये असताना अण्वस्त्रविरोधी मोहीम 'सीएनडी'चे ते सक्रिय कार्यकर्ते होते. मात्र, या समूहाने पुढे थेट अणुऊर्जेला विरोध करण्याची भूमिका घेतल्यावर त्यांनी या समूहाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन टाकला होता. जनुकीयरीत्या बदल घडवून केलेल्या प्रयोगांना विरोध केल्याने त्यांनी 'ग्रीन पीस'चे सदस्यत्वही तडकाफडकी सोडले होते. विज्ञानाचा योग्य अर्थ लावून काळाच्या पुढचे पाहणारा हा प्रज्ञावंत संशोधक होता. त्यांना भौतिकशास्त्रातील वूल्फ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते व पुरस्कार प्रदान करण्याचा सोहळा जेरूसलेममध्ये आयोजित करण्यात आला होता. मात्र, इस्रायल पॅलेस्टिनी नागरिकांना देत असलेल्या वागणुकीचा निषेध म्हणून त्यांनी पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्यास स्पष्ट नकार कळवला होता. पीटर हिग्ज यांनी विश्वनिर्मितीच्या शोध प्रवासातील एक महत्त्वाची रीत आपल्या सिद्धांताने शोधून काढली. त्या वाटेवरून पुढे जात हा शोध निरंतर सुरूच राहील. हे देवकण कुणी निर्मिले याचा शोध आता वैज्ञानिक घेत आहेत व या कणांची निर्मिती प्रयोगशाळेत करता येईल का? याचाही प्रयत्न सुरू आहे. त्यात यश आले तर अवघ्या विश्वाला नव्याने पालाण घालायला मानवप्राणी सज्ज होईल हे निश्चित! प्रखर वैज्ञानिक जाणिवा ठेवून ठोस भूमिका घेणा-या या प्रज्ञावंत शास्त्रज्ञाच्या जाण्याने भौतिकशास्त्राच्या विश्वात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या प्रज्ञावंत शास्त्रज्ञाला एकमत परिवाराची मन:पूर्वक विनम्र आदरांजली!

# 'तटस्थ दक्षता विभाग' असल्याशिवाय प्रशासनातील भ्रष्टाचार थांबेल कसा?



राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यामधील टोकाच्या नैतिक अध:पतनामुळे वर्तमानात सर्वच सरकारी कार्यालये, महामंडळे ही भ्रष्टाचार, लाचखोरी, आर्थिक घोटाळ्यांनी बरबटले आहेत. प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील 'अर्थपूर्ण' हितसंबंधामुळे राज्य -केंद्र सरकारी कार्यालये आणि भ्रष्टाचार यांच्यामध्ये अतूट नाते निर्माण झालेले आहे.महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि महामंडळे भ्रष्ट व्यवस्थेचे सर्वोत्तम पुरावे ठरतात. मुंबई -नवी मुंबई -ठाणे -पुणे -नागपूर या महापालिकांच्या कारभाराचे 'डोळसपणे' अवलोकन केले तर हे अत्यंत स्पष्टपणे दिसून येते की, सर्वत्र दर्जेदार कामाचे वावडेच असल्याचे दिसते. कदाचित 'पुन्हा पुन्हा कामाच्या माध्यमातून मलिदा लाटण्याची संधी प्राप्त व्हावी' या दूरदृष्टिकोनातून लोकप्रतिनिधी व प्रशासकीय मंडळी जाणीवपूर्वक असे करतात की काय, ही चर्चा एव्हाना सार्वत्रिक झालेली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून निवडून येणाऱ्या नगरसेवकाला 'निवडणुकीतील गुंतवणूक परतफेडीची' संधी मिळावी यासाठीच काही कोटींच्या खर्चाने बांधलेले रस्ते, फुटपाथ, गटारे -नाले, समाजोपयोगी इमारती अशा विविध कामांचा दर्जा हा निकृष्ट राखला जातो की काय अशी करदात्या नागरिकाला शंका उरलेली नसून खात्री पटलेली आहे. राज्य -केंद्र सरकारच्या अख्यतारीतील यंत्रणेतील भ्रष्टचाराचे एक प्रमुख कारण म्हणजे 'अधिकाऱ्यांच्या नियुक्ती -बदल्यातील मोठा आर्थिक व्यवहार'. आज मुंबई -नवी मुंबई -ठाणे सारख्या महापालिकेत आयुक्त म्हणून बदली हवी असेल, एखाद्या ठिकाणी पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती -बदली हवी असेल, पनवेल- ठाणे सारख्या दुय्यम निबंधक कार्यालयात निबंधक म्हणून नियुक्ती -बदली हवी असेल तर किंमत मोजावी लागते. ही केवळ प्रातिनिधिक उदाहरणे झाली. राज्य असो की केंद्र सरकार- दोन्ही ठिकाणी बदल्या कशा केल्या जातात, मिळवल्या जातात, हे उघड गुपित आहे. पुढे अशा पद्धतीने नियुक्ती -बदली मिळवल्यानंतर 'मोजलेल्या किंमतीच्या काही पट वसुली करण्यासाठी' मग भ्रष्टचाराचा मार्ग चोखाळला जातो. लोकप्रतिनिधी -मंत्री यांचे हात ओले झालेले असल्याने ही मंडळी देखील अशा प्रकारच्या भ्रष्ट कारभाराला, आर्थिक लुटीला वरदहस्त देताना दिसतात. अशा प्रकारच्या कार्यपद्धतीमुळे 'न खाऊंगा, न खाने दूंगा' अशा घोषणांनंतरही भ्रष्टाचाराचे स्थान अढळ राहाते. उलटपक्षी भ्रष्टचाराला सर्वपक्षीय राजमान्यता प्राप्त होताना दिसते आहे. 'भ्रष्टाचार मुक्त कारभारा'ऐवजी भ्रष्टाचार अधिकाधिक सर्वव्यापी होतो आहे. या भ्रष्ट कारभाराला काही अंशी लगाम घालण्यासाठी भविष्यात राज्य -केंद्र सरकारने सर्वच शासकीय कार्यालये, महामंडळे या ठिकाणी तटस्थ दक्षता विभागाच्या नियुक्तीचा उपक्रम राबवणे, हा उपाय ठरू शकतो.वर्तमानात अनेक शासकीय कार्यालयांमध्ये दक्षता विभाग अस्तित्वात आहेत; पण त्यांची अवस्था ही केवळ बुजगावण्यासारखी झालेली आहे. उदा.- सार्वजनिक बांधकाम विभागात रस्ते बांधणी विभागाचा कार्यभार सांभाळलेली व्यक्तीच भविष्यात दक्षता विभागात नेमली जाते किंवा दक्षता विभागात कार्यरत असणारी व्यक्तीची नियुक्ती ही रस्ते बांधणी विभागात अभियंता म्हणून केली जाते. त्यामुळे आज मी खातो तो केवळ बघ्याची भूमिका घेतो, उद्या तू खा तेव्हा मी बघ्याची भूमिका घेईन अशी अवस्था दक्षता विभागाची झाल्यास नवल नाही. दक्षता विभागच किती भ्रष्ट असतो याचे प्रातिनिधिक उदाहरण हवे असेल तर ते सिडकोचे देता येऊ शकेल. सिडकोतील अनेक कर्मचारी -अधिकाऱ्यांना लाचखोरीच्या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधात्मक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले आहे; परंतु वर्षानुवर्षे त्याच ईमारतीत कार्यरत असणाऱ्या दक्षता विभागाला मात्र अशा कारवाया होण्याआधी, सिडकोत कुठलाच गैरप्रकार आढळून येत नाही. अगदी तीन/चार वर्षे बोगस कर्मचाऱ्यांच्या नावाने पगार काढले गेल्याचादेखील दक्षता विभागाला थांगपत्ता लागू नये, अशी स्थिती! अशीच अवस्था मुंबई महापालिकेतील दक्षता विभागाची दिसते.'तटस्थ दक्षता विभाग' नेमणे हा त्यावरचा उपाय असू शकतो. राज्य सरकारच्या कार्यालयांमध्ये केंद्र सरकार नियुक्त कर्मचारी -अधिकाऱ्यांचा समावेश असावा. राज्य सरकारला अशा कर्मचारी -अधिकाऱ्यांच्या नियुक्ती -बदलीचा कुठलाही अधिकार नसावा जेणेकरून दक्षता विभागातील कर्मचारी -अधिकारी कोणत्याही दबावा खेरीज कामे करू शकतील! अशाच प्रकारे केंद्र सरकारच्या कार्यालयात केंद्र सरकारच्या अखत्यारीतील कर्मचारी -अधिकाऱ्यांची नेमणूक न करता अन्य प्रकारे 'स्वायत्त विभागातील' व्यक्तींची नेमणूक केली जावी. किंवा केंद्र सरकारच्या कार्यालयातील दक्षता विभागात अन्य राज्यातील कर्मचारी -अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची पद्धती सुरू करावी. उदा. महाराष्ट्रातील केंद्र सरकारच्या कार्यालयात महाराष्ट्राव्यतिरिक्त अन्य विविध राज्यांतील कर्मचारी -अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जावी. सर्वात महत्वाचे म्हणजे 'तटस्थ दक्षता विभागा'तील कर्मचारी -अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व बदल्या या पूर्णतः संगणकीय पद्धतीने किंवा लॉटरी पद्धतीनेच केल्या जाव्यात.लोकपालांचे नियंत्रण हवे तटस्थ दक्षता विभाग हा खऱ्या अर्थाने तटस्थ राहील यासाठी या विभागातील कर्मचारी -अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या -बदल्या या 'लोकपाल'सारख्या तटस्थ यंत्रणेमार्फत केल्या जाव्यात. त्याचबरोबर राज्य -केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आयएएस, आयपीएस आणि आयआरएस अधिकाऱ्यांच्या बदल्या या लोकपाल नियंत्रित विभागाकडून करण्याचे योजिले जावे. जोवर बदल्यातील भ्रष्टाचाराला आळा घातला जात नाही तोवर भ्रष्टाचार मुक्त शासन -प्रशासन हे स्वप्न कधीच पूर्णत्वास जाऊ शकणार नाही. त्या त्या विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या या त्याच विभागाच्या मंत्र्याच्या अखत्यारीत किंवा मुख्यमंत्री / पंतप्रधान यांच्या अखत्यारीत येत असल्याने अधिकारी मंडळी वरिष्ठ लोकप्रतिनिधीकडून येणाऱ्या नियमबाह्य गोष्टींना टाळू शकत नाहीत. त्यांच्या बदल्या जर लोकप्रतिनिधींच्या हातात ठेवल्या नाहीत तर निश्चितपणे प्रामाणिक अधिकाऱ्यांना बळ मिळू शकेल.

गेल्या ७५ वर्षांत अनेक मंत्री -मुख्यमंत्री -पंतप्रधान बदलले तरी भ्रष्टाचाराला आळा बसू शकलेला नाही. त्यामुळे व्यवस्था परिवर्तन हवे असेल तर चौकटीबाहेरचा विचार करूनच उपाययोजना करणे काळाची गरज ठरते .

# जिमला जाण्यापूर्वी ‘या’ वेळेत करा बीटाच्या रसाचे सेवन; स्नायू राहतील मजबूत, वाचा तज्ज्ञ काय म्हणतात

तुम्ही वजन वाढविण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी, तसेच फिट राहण्यासाठी व्यायामशाळेत जाता आणि तिथे प्रशिक्षक तुम्हाला वेळोवेळी कोणता व्यायाम करायचा, तो व्यायाम कोणत्या उपकरणांवर कशा पद्धतीने करायचा, त्यादरम्यान कोणत्या पदार्थांचे सेवन करायचे याचा सल्ला देत असतात. अनेक जण सकाळी, तर काही जण संध्याकाळी व्यायामशाळेत जाऊन व्यायाम करतात. पण, तुम्ही व्यायामशाळेत जाण्यापूर्वी योग्य पदार्थ किंवा पेयाचे सेवन करता का हेसुद्धा तुम्हाला माहीत असणे गरजेचे आहे. आज आपण या लेखातून व्यायामशाळेत जाण्यापूर्वी कोणत्या पेयाचे सेवन केले पाहिजे आणि त्याचे आरोग्यसाठी काय फायदे आहेत हे पाहणार आहोत.जर तुम्ही संध्याकाळी व्यायामशाळेत जाण्यापूर्वी (प्री-जिम) कॉफीचे सेवन करीत असाल, तर तुम्ही अत्यंत चुकीचे वागत आहात. तज्ज्ञांच्या मते, एक कप कॉफी जरी तुम्हाला ऊर्जा देत असली तरी त्याचा तुमच्या झोपेच्या गुणवत्तेवर परिणामही होतो. एफआयटीटीआर यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडीओनुसार, रात्री ११ वाजेपर्यंत जर तुम्ही झोपत असाल, तर दुपारी ३ नंतर तुम्ही कॉफीचे सेवन टाळले पाहिजे. कारण- कॅफिन शरीरात आठ तास टिकून राहते; ज्यामुळे नकळत तुमच्या झोपेवर याचा परिणाम होऊ शकतो. तर आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, मग संध्याकाळी व्यायामशाळेत जाण्यापूर्वी कॉफीव्यतिरिक्त कशाचे सेवन करायचे? तर एफआयटीटीआरच्या व्हिडीओनुसार, एखादी व्यक्ती बदल म्हणून कॉफीऐवजी बीटाच्या रसाचे सेवन करू शकते. बीटाच्या रसामध्ये नैसर्गिक नायट्रिक असते; जे कॅफिनप्रमाणेच पॉवर बूस्टरसारखे कार्य करते. तसेच तुमच्या झोपेच्या गुणवत्तेवरही याचा परिणाम होत नाही. त्यामुळे बीटरूट ज्युस हे तुम्हाला उर्जा वाढविण्यासाठी आवश्यक ठरणारे एक अमृत आहे.याचसंबंधित द इंडियन एक्स्प्रेसने पोषणतज्ज्ञ, होलिस्टिक वेलनेस कोच आणि ईट क्लीन विथच्या संस्थापक एशांक वाही यांच्याशी संवाद साधला. यावेळी डॉक्टरांनी बीटाच्या रसाद्वारे शारीरिक कार्यक्षमता आणि सहनशक्ती वाढविण्याच्या फायद्यांवर लक्ष



केंद्रित केले. कॉफी एकाग्रता वाढवू शकते; पण कॉफीच्या सेवनाने लघवीचे प्रमाणदेखील वाढू शकते. त्याशिवाय कॉफीमधील कॅफिन जरी मध्यम प्रमाणात फायदेशीर असले तरीही ते हृदयाची गती आणि अस्वस्थता वाढवू शकते; ज्यामुळे तुमची कार्यक्षमता कमी होऊ शकते, असे एशांक वाही यांनी स्पष्ट केले.तर पुढे त्यांनी सांगितले की, बीटाचा रस नायट्रेट्सचे एक पॉवरहाऊस आहे. नायट्रिक घटक पोटात गेल्यावर त्याचे नायट्रिक ऑक्साइडमधे परिवर्तन होते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार ही प्रक्रिया शरीराच्या स्नायूंना मजबूत बनवते, तुमच्या स्नायूंमधील रक्तप्रवाह आणि ऑक्सिजनची पातळी वाढते. ज्यामुळे जास्त वेळ किंवा त्रासदायक वर्कआउट्ससुद्धा तुम्ही अगदी सहज करू शकता.बीटरूटचा रस कसा बनवायचा?एक बीट स्वछ धुऊन घ्या आणि ते सोलून घ्या. त्यानंतर त्याचे लहान तुकडे करा आणि अर्धा कप पाणी घालून मिक्सरमध्ये बारीक करून घ्या. तयार झालेला रस गाळून घ्या. चव आणि पौष्टिकता वाढविण्यासाठी तुम्ही यात आल्याचा एक छोटा तुकडा किंवा लिंबाचा रससुद्धा घालू शकता, असे एशांक वाही यांनी सांगितले आहे.बीटाच्या रसाचे सेवन करण्याची उत्तम वेळ कोणती?व्यायमापूर्वी सुमारे दोन ते तीन तास आधी बीटाच्या रसाचे सेवन करा. कारण- त्यात अँटिऑक्सिडंट्स आणि दाहकविरोधी गुणधर्म असतात. तसेच हे तुमच्या स्नायूंचे दुखणेदेखील कमी करते. तसेच केवळ व्यायामापूर्वीच नाही, तर दीर्घकालीन आरोग्यासाठीही हा एक उत्तम पर्याय आहे, असे एशांक वाही यांनी सांगितले आहे. कॉफी वाईट आहे का?बीटाचा रस शारीरिक ऊर्जा जास्तीत जास्त वाढवू पाहणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. याचा अर्थ असा नाही की, कॉफीला निरोगी जीवनशैलीत स्थान नाही. पण, खेळाडू किंवा फिटनेससाठी जागरूक व्यक्तींच्या विशिष्ट गरजांसाठी बीटाचा रस हा एक उपाय ठरेल, असे एशांक वाही यांचे म्हणणे आहे. आज आपण या लेखातून व्यायामापूर्वी बीटाच्या रसाचे सेवन का करायचे ते समजून घेतले.

# प्रियकराचा मृतदेह घेऊन ’ती’चा ४८ तास प्रवास, पण अखेर हत्येचे बिंग फुटले

प्रवीण आजगेकर, गडहिंग्लज एखादी स्त्री सुडाने पेटली, तर ती कोणत्या थराला जाईल, काही सांगता येत नाही. राजेंद्रने सुनीताचा विश्वासघात केला होता, तिच्यासोबत संसाराच्या आणाभाका घेऊन तिच्या भावनेचा बाजार मांडला होता. त्यामुळे सुडाने पेटलेल्या सुनीताच्या सुडाग्नीत राजेंद्रचे आयुष्य तर भस्मसात झालेच; पण त्याला खरोखरीच भस्मसात करण्याच्या प्रयत्नात सुनीताच्याही उभ्या आयुष्याची होरपळ झाली सुनीता ही एक कोल्हापूर जिल्ह्याच्या गडहिंग्लज तालुक्यातील हासूर सासगिरी या एका खेडेगावातील महिला. नजीकच्या गावातीलच एका तरुणासोबत तिचे लग्न झाल्यानंतर ती पतीसोबत मुंबईत येऊन स्थायिक झाली. लग्नानंतर सुनीताला एक मुलगाही झाला; पण तिचा संसार काही सुखाचा होऊ शकला नाही. काहीतरी कारणावरून नवर्याचे आणि तिचे बिनसले आणि दोघेही विभक्त झाले. पदरी एक लहान मुलगा असल्याने पोटापाण्यासाठी सुनीता चार घरची धुणीभांडी करून संसार चालवू लागली. सुनीता जरी धुणीभांडी करीत असली, तरी गाठीला गाठ मारून पोटच्या लेकरासाठी म्हणून ती बर्यापैकी पैसे बाळगून होती.अशातच एकेदिवशी तिचा राजेंद्र याच्याशी परिचय झाला. हा परिचय हळूहळू वाढत गेला आणि दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. राजेंद्र हा मूळचा परभणी जिल्ह्यातील होता आणि कामाधंद्याच्या निमित्ताने तोही मुंबईतच स्थायिक झाला होता. प्रेमसंबंधातून राजेंद्रचे नित्यनेमाने सुनीताच्या घरी जाणे-येणे होते. त्याने सुनीताला लग्नाचेही आमिष दाखविले होते. प्रेमसंबंध आणि लग्नाच्या आणाभाका घेत राजेंद्रने सुनीताकडून बरीच मोठी रक्कम उकळली होती. मात्र, सुनीताने लग्नाचा विषय काढला, की राजेंद्र काही तरी कारण सांगून वेळ मारून नेत होता. काही दिवस सुनीता त्याच्या भूलथापांना ती बळी पडली; मात्र हळूहळू राजेंद्र आपणाला फसवत असून, तो काही आपल्याशी लग्न करणार नसल्याची सुनीताला खात्री पटली. त्यानंतर मग तिने राजेंद्रला उसने दिलेले पैसे मागण्यास सुरुवात करताच त्याने पैसे देण्यासही टाळाटाळ सुरू केली. मग मात्र सुनीता चवताळली आणि काहीही करून राजेंद्रला धडा शिकवायचे तिने ठरविले.हळूहळू पैशाच्या कारणावरून सुनीता आणि राजेंद्र यांच्यात भांडणतंटा सुरू झाला. त्यामुळे सुनीताच्या मनातील सुडाग्नी दिवसेंदिवस भडकतच चालला. लग्नही नाही अन् पैसेही मिळत नसल्याने संतापलेल्या सुनीताने एकेदिवशी गोड बोलून राजेंद्रला खोलीत बोलावून घेतले. खाण्या-पिण्यातून त्याच्या पोटात झोपेच्या भरपूर गोळ्या उतरविल्या अन् एका मित्राला बोलावून घेत तिने राजेंद्रचा गळा आवळून त्याचा खेळ खल्लास करून टाकला. राजेंद्रला संपविले खरे, मात्र त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची कशी, हा गहन सवाल रात्रभर तिच्या डोक्यात घोळत होता. या विचारातच तिने अख्खी रात्र मृतदेहासोबत एकटीने घालविली. दुसर्या दिवशी सकाळी तिने मृतदेह सामावेल अशी प्रवासी बॅग खरेदी केली. या बॅगेत तिने राजेंद्रचा मृतदेह कोंबला. मृतदेह बॅगेत कोंबताना



तिच्या डोक्यात केवळ सुडाग्नीच नाचत होता. राजेंद्रने आपल्याशी केलेल्या प्रतारणेचा राग तिच्या डोक्यात घुसळत होता. राजेंद्रचा मृतदेह कोकरातील एखाद्या निर्जन भागात नेऊन पेटवून टाकून पुरावा नष्ट करण्याचा तिचा बेत होता. त्यानुसार तिने मुंबईतून एक टॅक्सी भाड्याने ठरवली आणि राजेंद्रचा मृतदेह चालकाच्या मदतीने तिने गाडीच्या डिक्कीत ठेवला आणि चेहर्यावर कोणत्याही भावनांचा लवलेश न दाखविता तिने मृतदेहासोबत चक्क मुंबई ते कोल्हापूर जिल्हा इतका जवळपास ५०० कि.मी. चा प्रवास केला. या प्रवासात अनेक ठिकाणी चेकनाके होते, गर्दी होती. मात्र, या सगळ्याला चकवा देत राजेंद्रचा मृतदेह आजरा तालुक्यातील मुमेवाडी घाटापर्यंत आणला. त्यापूर्वी तिने पेट्रोल खरेदी करून मृतदेह जाळण्याचे नियोजन केले. मुमेवाडी घाटात निर्जनस्थळ पाहून सुनीताने एकटीने मृतदेह असलेली बॅग ओढत एका निर्जन ठिकाणी नेली. मृतदेहाची बॅग उघडून ती मृतदेहावर पेट्रोल ओतणार इतक्यात तिच्या नशिबाने तिला दगा दिला अन् पेट्रोलिंगवर असलेल्या पोलिसांना या निर्जनस्थळी थांबलेल्या टॅक्सीची शंका आली आणि त्यांनी चौकशी करताच राजेंद्रच्या हत्येचे बिंग फुटले.मृतदेहासोबत ४८ तास! खून झालेला दिवस अन् सुनीता पोलिसांच्या हातात सापडलेली वेळ पाहिली, तर जवळपास ४८ तास ती प्रियकराला मारून त्याचा मृतदेह घेऊन प्रवास करत होती. भावनाशून्य मनाने आणि चेहर्याने तिने केलेले कृत्य आणि त्यानंतर रचलेला बेत हा तिच्यातील सुडाग्नीची जाणीव करून दिल्याशिवाय राहत नाही. कदाचित पेट्रोल ओतून तिने मृतदेह जाळला असता, तर पोलिसांना तिच्यापर्यंत पोहोचताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले असते. मृतदेहासोबतच्या तिच्या या प्रवासाने तिच्या मनातील सुडाग्नीच्या ज्वालांनी मात्र सीमा ओलांडली, हे नक्की.

# सावधान..! भारतात फेअरनेस क्रीमच्या वापरामुळे किडनीच्या समस्यांमध्ये वाढ : जाणून घ्या नवीन संशोधन


गोर्या त्वचेबद्दल आपल्या समाजामध्ये असणारे आकर्षण हा नेहमीच चर्चेचा विषय ठरला आहे. गोरी त्वचा हवी, या मानसिकतेमधूनच आपल्या देशात फेअरनेस क्रीमची मोठी बाजारपेठही आहे. आता नवीन संशोधन आपल्याला गोरे दिसण्याचा मोहाचा विचार करायला लावणारा ठरला आहे. भारतात या क्रीममध्ये पारा जास्त प्रमाणात असून, यामुळे किडनीला हानी पोहोचते, असा निष्कर्ष नव्या संशोधनात काढण्यात आला आहे. हे संशोधन किडनी इंटरनॅशनल या मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.‘किडनी इंटरनॅशनल’मध्ये प्रकाशित अभ्यासात नमूद करण्यात आले आहे की, उच्च पारा सामग्री असलेल्या फेअरनेस क्रीम्सचा वाढता वापर मेम्ब्रेनस नेफ्रोपॅथीला चालना देते. यामुळे मूत्रपिंडाच्या फिल्टरला नुकसान होते. प्रथिने गळतीस कारणीभूत ठरते. चछ हा एक स्वयंप्रतिकार रोग आहे. यामुळे नेफ्रोटिक सिंड्रोम होतो. हा एक मूत्रपिंड विकार आहे.शरीर मूत्रात जास्त प्रथिने उत्सर्जित करते. फेअरनेस क्रीम्समध्ये वापरण्यात येणारा पारा हा मूत्रपिंडाच्या फिल्टरसाठी त्रासदायक आहे. यामुळे नेफ्रोटिक सिंड्रोम प्रकरणांमध्ये वाढ होते, असे केरळ येथील कोट्टाक्कल येथील एस्टर एमआयएमएस हॉस्पिटलमधील नेफ्रोलॉजी विभागातील संशोधक डॉ. सजीश शिवदास एका पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे.भारतीय बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या फेअरनेस क्रीम्स झटपट गोरे होण्याची आश्वासन देतात, परंतु कोणत्या किंमतीवर?, असा सवालही डॉ. सजीश शिवदास यांनी केला आहे.किडनीच्या या अभ्यासात जुलै २०२१ ते



सप्टेंबर २०२३ दरम्यान थकवा, सौम्य सूज आणि लघवीचा वाढता फेसाळ यासारखी लक्षणे असणार्या २२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. फक्त तीन रुग्ण वगळता सर्वांच्या लघवीत प्रथिनांचे प्रमाण वाढले होते. एका रुग्णाला सेरेब्रल व्हेन थ्रोम्बोसिस, मेंदूमध्ये रक्ताची गुठळी झाली होती. निष्कर्षांवरून असे दिसून आले आहे की २२ पैकी सुमारे ६८ टक्के किंवा १५ न्यूरल एपिडर्मल ग्रोथ फॅक्टर सारख्या १ प्रोटीनसाठी पॉझिटिव्ह होतेचे एक दुर्मिळ प्रकार जे घातकतेशी संबंधित असण्याची अधिक शक्यता असते. १५ रूग्णांपैकी १३ रूग्णांनी त्यांची लक्षणे दिसू लागण्यापूर्वी त्वचेची फेअरनेस क्रीम्स वापरून दाखल केले. उरलेल्यांपैकी एकाला पारंपारिक स्वदेशी औषधांचा वापर करण्याचा इतिहास होता तर दुसऱ्याला ओळखण्या योग्य ट्रिगर नव्हता.बहुतेक प्रकरणे उत्तेजित करणाऱ्या क्रीम्सचा वापर बंद केल्यावर सोडवली गेली. सार्वजनिक आरोग्यास संभाव्य धोका निर्माण झाला आहे. अशा उत्पादनांच्या वापराच्या धोक्यांबद्दल जनजागृती करणे. या धोक्याला आळा घालण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्यांना सतर्क करणे अत्यावश्यक आहे, असेही संशोधकांनी स्पष्ट केले आहे.ही फक्त स्किनकेअर/मूत्रपिंडाच्या आरोग्याची समस्या नाही; हे एक सार्वजनिक आरोग्य संकट आहे. त्वचेवर पारा लावल्याने हानी होऊ शकते, तर त्याचे सेवन केल्यास परिणामांची कल्पना करा. या हानिकारक उत्पादनांचे नियमन करण्यासाठी आणि जनतेचे संरक्षण करण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची हीच वेळ आहे, असेही त्यांनी म्हटलं आहे.

# वृक्षासन अभ्यास करण्याची योग्य पद्धत, जाणून घ्या फायदे

योगाचा अभ्यास शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कधी कधी अभ्यास करतांना चुकीचे आसन, स्थिति, श्वास घेण्याच्या चुकीच्या पद्धतीने आरोग्याला नुकसान देखील होऊ शकते. जर तुम्ही योगाभ्यास करणार आहात तर आसन-योगासनचा अभ्यास नक्की करा. आसनयोग मध्ये वृक्षासन सहभागी आहे. ज्याला इंग्लिशमध्ये ट्री -पोज म्हणतात. नावाप्रमाणे असलेले वृक्षासन मध्ये शरीर वृक्षासनच्या मुद्रामध्ये असते आणि त्यामध्ये संतुलन बनुन राहते . वृक्षासनचे फायदे- वृक्षासन संतुलन बनवणारे आसन आहे. ज्यामध्ये शारीरिक आणि भावनिक आरोग्य दोन्ही संतुलित राहण्यासाठी मदत मिळते. वृक्षासन पाय, घोटा, पोटरी, गुडगे, मांडया यांच्या स्नायूंना मजबूत बनवते. हे आसन केल्याने एकाग्रता वाढते. मज्जातंतूची समस्या असल्यास हे आसन केल्याने आराम मिळतो. वृक्षासन पाठीचाकणा मजबूत बनवते. तसेच गुडगे देखील मजबूत बनवते. वृक्षासन हे डोळे, कान, खांदे, मजबूत करण्यासाठी फायदेशीर आहे. या आसनामुळे छातीची रुंदी वाढण्यास मदत होते. वृक्षासन करण्याची योग्य पद्धत- वृक्षासनच्या अभ्यासासाठी सरळ उभे रहा. डाव्या गुडग्याला वाकवून डावा पाय उजव्या मांडीवर ठेवावा. उजवा पाय सरळ ठेऊन शरीराचे संतुलन बनवा. हातांना डोक्याच्या वरती घेऊन आता तळहातांना एकमेकांना मिळवून नमस्कार मुद्रमध्ये घ्या. काही वेळपर्यंत याच मुद्रेमध्ये राहावे. मग श्वास सोडून सामान्य स्थितीत परत या. सावधानी- वृक्षासनचा अभ्यास सुरक्षित आहे आणि कोणीही हे आसन करू शकत. पण जर उच्च रक्तचाप असेल तर हे आसन डॉक्टरांचा सल्ला घेऊन किंवा एखाद्या विशेषज्ञ समोर अभ्यास करा ज्यांना उच्च रक्तचाप आहे त्यांनी वृक्षासन करतांना हात वरती न घेऊन जाता छातीजवळ नमस्कार मुद्रमध्ये ठेवा. वार्टिंगो किंवा मायग्रेनची समस्या असेल तर हे आसन करू नये. योग्य वेळ- वृक्षासनचा अभ्यास सकाळीच केला गेला पाहिजे. पण सकाळी



वेळ मिळत नसल्यामुळे जर तुम्ही हा अभ्यास संध्याकाळी करत असाल तर जेवण करण्यापूर्वी ४ ते ५ तास अगोदर करावा. लक्षात ठेवा की आसन करण्यापूर्वी शौचाल्यास जावून यावे म्हणजे पोट रिकामे असावे. वृक्षासनच्या अभ्यासापूर्वी त्रिकोणासन, वीरभद्रासन २ आणि बद्ध कोणासन केले पहिजे. सोबतच वृक्षासनच्या अभ्यासानंतर उभे राहून केले जाते तेच आसन करावे.

# नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीच्या जेवणात कोणती बाजरी खावी? जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात

निरोगी राहण्यासाठी योग्य आहार घेणे गरजेचे आहे. निरोगी दिनचर्या आपले शरीर मजबूत करते. निरोगी जीवनशैलीसाठी सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या जेवणपर्यंत आपला आहार चांगला असणे आवश्यक आहे. पण, तुमच्या जेवणात कोणत्या पदार्थांचा समावेश असावा? आपल्या जेवणाच्या तिन्ही वेळांना तुमच्या आहारात बाजारी असावी का, मग कोणती बाजरी खाणे तुमच्यासाठी चांगले आहे? याच विषयावर मुख्य आहार तज्ज्ञ डॉ. नॅन्सी साहनी यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.डॉ. नॅन्सी सांगतात, बाजरी आरोग्यदायी आहे. त्यामध्ये कार्ब्स, प्रोटीन, लोह, झिंक व अमिनो ॲसिड यांसारखे पोषक घटक आढळतात. त्याशिवाय बाजरीमध्ये राबोफ्लेविन, फॉलिक ॲसिड व बिटा कॅरोटिन असतात. बाजरीमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंट्स व फायबर मुबलक प्रमाणात असतात; जे आपल्या शरीराला निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. आपले आरोग्य चांगले राहावे आणि वजन वाढू नये यासाठी अनेकदा बाजरीची भाकरी खाल्ली जाते.नाश्त्यासाठी कोणती बाजरी उत्तम आहे?न्याहारी आणि दुपारच्या जेवणात दिवसातून एकदा बाजरीचा समावेश करणे चांगले आहे, कारण- त्यामुळे आपल्या क्रियाकलाप पचन प्रक्रियेस मदत मिळते. नाश्त्यासाठी नाचणी (बाजरी) बरोबर निरोगी दलिया बनवा. नाचणी ही एक बहुमुखी बाजरी आहे; ज्यामध्ये अमिनो सिड असते, जे भूक कमी करते आणि वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. त्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी खाली येते. मधुमेह आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या असलेल्यांसाठीही हे अत्यंत फायदेशीर आहे. दुपारच्या जेवणासाठी कोणती बाजरी उत्तम आहे?मोती बाजरी आणि ज्वारीने बनवलेल्या भाकऱ्यांसाठी पीठ कोमट पाण्याने चांगले मळून घेतले जातात. मेथी/किसलेला मुळा/गाजर, कढीपत्ता, कांदे आणि काही मसाले यात घाला. डाळ आणि हिरव्या भाजीबरोबर घ्या. बाजरीत जास्त प्रमाणात मॅग्नेशियम असते आणि ते मायग्रेनचे झटके, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, दमा आणि संबंधित श्वसन समस्या दूर करण्यासाठी ओळखले जाते.मोत्याच्या बाजरीमध्ये अँटिऑक्सिडंट्स असतात जे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग रोखण्यास मदत करतात. गव्हाच्या चपातीच्या बदल्यात बाजरीचा समावेश करा, ज्वारी संधिवात प्रतिबंधित करते. उन्हाळ्यात थंडगार, ज्वारी चिला आणि उपमाच्या स्वरूपातही खाता येते.रात्रीच्या जेवणात कोणती बाजरी असावी?दिवसाचे शेवटचे जेवण हलके असावे आणि जर तुम्ही तुमचा बाजरीचा कोटा पूर्ण करण्यासाठी हे जेवण निवडत असाल, तर बार्नयार्ड बाजरीची खिचडी ही सर्वांत चांगली बाब आहे. मूग डाळ व भाज्या घाला आणि प्रेशर कुकरमध्ये चांगले शिजवा. दुसरा पर्याय म्हणजे फॉक्सटेल (मॅग्नेशियम जास्त) उपमा, चणा डाळ आणि चिरलेल्या भाज्या. रात्रीच्या जेवणात या दोन्ही बाजरी पोटाला हलकी होतील. बार्नयार्डमध्ये कॅल्शियमचे प्रमाण सर्वाधिक असते; जे तांदूळ किंवा गव्हाच्या १० पट असते. हे पचण्याजोगे प्रथिने व विद्रव्य आणि अघुलनशील घटकांच्या चांगल्या संतुलनासह आहारातील फायबरचा एक चांगला स्रोतदेखील आहे. बार्नयार्ड बाजरीमध्ये कमी कार्बोहायड्रेट सामग्री असते; जी हळूहळू पचते. त्यामुळे रक्तातील ग्लुकोज आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित होते.



# ग्रामीण विधानसभा महायुतीचा आज लातूर येथे भव्य मेळावा

लातूर दि. १५- लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई, रासप व मित्रपक्ष महायुतीचा भव्य मेळावा दि. १६ एप्रिल २०२४ मंगळवार रोजी लातूर येथील गिरवलकर मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास महायुतीच्या सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिका-यांसह कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महायुतीचा मेळावा भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या मेळाव्यास राज्याचे युवक कल्याण व क्रिडा मंत्री ना. संजय बनसोडे, भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, जिल्हयाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, अहमदपूरचे आ. बाबासाहेब पाटील, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, शिक्षक आमदार विक्रम काळे, राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, किसान मोर्चाचे राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी आमदार सुधाकर भालेराव, गोविंदअण्णा केंद्रे, बब्रुवान खंदाडे, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, लातूर लोकसभा निवडणूक प्रभारी प्रा. किरण पाटील, शिवसेना संपर्क प्रमुख ॲड. बळवंत जाधव, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. व्यंकटराव बेद्रे, प्रदेश रिपाई नेते चंद्रकांत चिकटे, रासपचे प्रा. विष्णू गोरे, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसरभाई शेख, शिवसेना जिल्हा प्रमुख ॲड. शिवाजीराव माने, जिल्हा प्रमुख गोपाळराव माने, रिपाईचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, रासपचे जिल्हाध्यक्ष नागनाथ घोडके, लोकसभा निवडणूक प्रमुख राहूल केंद्रे, माजी सभापती अशोककाका केंद्रे यांच्या अनेक मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. सदरील भाजपा महायुतीचा मेळावा दि. १६ एप्रिल २०२४ मंगळवार रोजी सकाळी १० वाजता गिरवलकर मंगल कार्यालय, बार्शी रोड लातूर येथे आयोजित करण्यात आला आहे तेव्हा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टी, शिवसेना (एकनाथ शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट), रिपाई (आठवले गट), रासप व इतर मित्र पक्ष महायुतीच्या सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह मतदार बंधू भगिनींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन लातूर ग्रामीण विधानसभा महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे स्वातंत्र्याची पहाट भिक्खू पय्यानंद थेरो

लातूर :- विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्माने व कर्तृत्वाने गुलामीची बंधने नष्ट झाली आहेत. भारतीय संविधान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अलौकिक बुद्धीमत्तेची प्रतिभा आहे. त्यांची जयंती ही समस्त बहुजन समाजाची प्रेरणा आहे त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती म्हणजे स्वातंत्र्याची पहाट आहे असे प्रतिपादन भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य, महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे पंचरंगी ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी ते बोलत होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी भंते बुद्धशील, आमदार अमित देशमुख, सार्वजनिक जयंती समितीचे अध्यक्ष जितेंद्र बनसोडे, भीमराव चौदते, अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे, मिलिंद धावारे, महाबुद्धवंदना अभिवादन कार्यक्रम सुकाणू समितीचे सर्व सदस्य व बौद्ध उपासक, उपासिका उपस्थित होते. यावेळी शुभेच्छापर संदेश देताना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, भारत देशाला अखंड ठेवण्यासाठी भारतीय संविधान हे पावलो पावली उपयुक्त सिद्ध झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म भारत देशासाठी गौरव व अभिमान आहे.

# चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांच्याकडून सुडे कुटुंबाचे सांत्वन

लातुर प्रतिनिधी : दि. १५ एप्रिल २०२४ लातूर तालुक्यातील हरंगुळ येथील कन्या व सध्या पुणे येथील अभियांत्रीकी महाविदयालयामध्ये शिक्षण घेत असलेली भाग्यश्री सूर्यकांत सुडे हीचा मृत्यु झाला होता त्याबद्दल सूर्यकांत सुडे कुटुंबाची विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. १५ एप्रिल रोजी हरंगुळ येथील निवासस्थानी जाऊन सुडे कुटूंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला. यावेळी चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी झालेली घटना दुर्दैवी असून या बाबत दुःख व्यक्त केले. यावेळी सूर्यकांत सुडे, डॉ. सारीका देशमुख, संगीता मोळवणे, सोनाली थोरमोटे व सुडे कुटुंबीय आदी उपस्थित होते.



# भारत देशाचा जगात सन्मान वाढविण्याचे काम पंतप्रधान मोदीजींनी केले - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर दि.१५-०४-२०२४ भारत देशातील १८ व्या लोकसभेची निवडणूक देशाच्या आणि जगाच्या दृष्टिने महत्त्वाची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शेतकर्यांसाठी शेतकरी सन्मान योजना, आरोग्य विमा, दुष्काळ अनुदान अशा विविध योजना राबवून देशातील शेतकर्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम केलेले आहे. युक्रेन-रशिया, इज्राईल-पाम युध्दामुळे भारत देशाच्या आर्थिक परिस्थितीवर मोठा परिणाम झालेला असून -५७ लाख कोटीचे नुकसान झालेले आहे. भारताचा जीडीपी -०.२६ टक्क्यावर आलेला आहे. अशा प्रतिकुल परिस्थितीवर जनतेला त्या परिस्थितीतून बाहेर काढून ८० टक्के जनतेला मोफत धान्य देऊन आधार देण्याचे काम केलेले आहे. २०१४ मध्ये ११ व्या क्रमांकावर असलेल्या भारत देशाला पाचव्या क्रमांकावर आणण्याचे काम केलेले आहे. भविष्यात भारत देश तिसर्या क्रमांकावर येईल. असे चित्र निर्माण झालेले आहे. त्यामुळे खर्या अर्थाने भारताचा आणि भारतीय नागरिकांचा जगात सन्मान वाढविण्याचे



काम पंतप्रधान मोदीजींनी केलेले आहे असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.यावेळी ते नांदेड लोकसभा मतदार संघाचे भोकर तालुक्यातील सोनारी येथे आयोजित १८ व्या लोकसभेसाठी नांदेड लोकसभा मतदार संघातून खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ खा.अशोकरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आयोजित जाहीर प्रचार सभेत बोलत होते.यावेळी या प्रचार सभेला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा.अशोकरावजी चव्हाण, आ.अमर राजूरकर, नांदेड लोकसभेचे उमेदवार खा.प्रतापराव पाटील चिखलीकर, जननायक संघटनेचे लातूर तालुका कार्याध्यक्ष राजाभाऊ मुळे, संभाजीराव पाटील रावणगावकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, देशाच्या १४० कोटी जनतेच्या भविष्याचा प्रश्न आहे. मोदी सरकारने शेतकर्यांच्या २३ वाणाला एमएसपी देण्याचे काम केले. शेतकर्यांच्या हितासाठी शेतकरी सन्मान योजना व दुष्काळी अनुदान अशा विविध योजनेच्या माध्यमातून शेतकर्याला आर्थिक आधार देण्याचे काम मोदीजींनी केले. विधानसभा व लोकसभेमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊन महिलांचा देशाच्या राजकारणामध्ये सन्मान वाढविण्याचे काम केलेले आहे. तसेच कर्नाटकातील रशीद काद्री व फैजल अली यांना पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानीत करण्याचे कामही त्यांनी केलेले आहे. काँग्रेस सरकारला ६५ वर्षात जे जमले नाही ते ९ वर्षात करून दाखविण्याचे काम मोदी सरकारने केलेले आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे हात बळकट करण्यासाठी खा.अशोकरावजी चव्हाण व नांदेड लोकसभेचे उमेदवार खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पाठिशी उभे राहण्याचे काम आपण करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.यावेळी या प्रचार सभेला भोकर तालुक्यातील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘राजमाता जिजामाता’ला डॉ. रुपाली पवार यांची भेट



लातूर, दि.१६ – पुण्याच्या सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठातील डॉ. रुपाली पवार यांनी सोमवारी येथील राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयास भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधून इयत्ता १२ वी नंतर विज्ञान शाखेतील विविध कोर्सेस संदर्भात माहिती दिली. आगामी काळात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन सेमिनार घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठ हे स्वायत्त विद्यापीठ आहे. या विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्तेबाबत जगभरात ख्याती आहे. या विद्यापीठाच्या डॉ. रुपाली पवार यांनी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयास सोमवारी सदिच्छा भेट दिली. इयत्ता १२ वी नंतर विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसमोर कोणता कोर्स निवडावा, याबद्दल संभ्रम असतो. इयत्ता १२ वी नंतर विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना बी. एस्सी. मेडिकल टेक्नॉलॉजी, बी. एस्सी. रेडिओथेरेपी, बी. एस्सी. मेंटल हेल्थ यानंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमात मेडिकल टेक्नॉलॉजी, असिस्टेड रिप्रोडक्शन टेक्नॉलॉजी ॲण्ड एम्ब्रोलॉजी, मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ आदी कोर्सेसबद्दल डॉ. पवार यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. आगामी काळात या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन सेमिनार घेणार असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेऊन आपले करिअर घडवावे, असे आवाहनही त्यांनी केले. २०२३ च्या ‘नीट’ परीक्षेत राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयातील संस्कृती पवार हिने ७२० पैकी ६९० तर याच महविद्यालयाच्या अनिकेत रोकडे याने ७२० पैकी ५८९ गुण मिळविल्याबद्दल डॉ. पवार यांनी यावेळी महाविद्यालयाचे कौतुक केले. सिम्बायोसिस विद्यापीठाच्यावतीने प्रसिध्द करण्यात आलेले ‘न्यू फेसेस ॲण्ड फ्रेंडस’ हे पुस्तक डॉ. पवार यांनी महाविद्यालयास भेट दिले.

# जय क्रांती महाविद्यालयात महामानवाला वाचनातून अभिवादन



लातूर. येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित जय क्रांती वरिष्ठ महाविद्यालयामध्ये ग्रंथालयाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या माध्यमातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ग्रंथालय विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना वेगवेगळे ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले या उपक्रमातून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून त्यांचे विचार आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जय क्रांती कनिष्ठ महाविद्यालयाच्या सेवानिवृत्त प्रा. डॉ. वसुंधरा गुडे प्राचार्य डॉ श्रीधर कोल्हे मंचावर डॉ. रीता कदम डॉ. संगीता घार यांची उपस्थिती होत्या. यावेळी उद्घाटन प्रसंगी गुडे मॅडम म्हणाल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसामान्य माणसाला गुलामगिरीतून मुक्त केले व सन्मानाने जगण्याची बळ दिले. भारतीय संविधानाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, समता, न्याय, बंधुत्व समाजामध्ये प्रस्थापित करणारे आहे आणि त्या विचारांची कास धरून चालणे चालणारा व्यक्ती हा खऱ्या अर्थाने सुदृढ समाज निर्माण करणारा समाज सुधारक आहे. आपण वाचन संस्कृती जोपासणे अतिशय आवश्यक आहे. असे मत व्यक्त केले. याप्रसंगी सूत्रसंचालन मनस्वी माळी हिने केले प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. रीता कदम यांनी केले तर आभार डॉ. खाकरे सर यांनी मानले. याप्रसंगी संजीवनी मराठे,डॉ. रामेश्वर स्वामी, डॉ. केशव अलगुले, डॉ. सतीश डांगे, डॉ प्रमोद चव्हाण डॉ. दिलीप गुंजर्गे, डॉ. धीरज कोतमे, डॉ. ए. व्ही. पवार डॉ. आर एस पवार, डॉ. हरिश्चंद्र चौधरी, डॉ. राजेश कारंजकर, डॉ. माया सरवदे, डॉ. सुमन शिंदे, डॉ. समीना शेख, डॉ. गीता वाघमारे प्रा. बाजुळगे, प्रा. गुडदे, श्री रामदास जाधव व इब्राहिम शेख यांची उपस्थिती होती.

# लातुरात उद्या भीम पहाट कार्यक्रम

लातूर / फ्री व्हॉइस ग्रुप, दि पीपल्स महिला अर्बन क्रेडिट को. ऑप सोसायटी लातूरच्या वतीने आयोजित भीम फेस्टिवलचा एक भाग म्हणून उद्या पहाटे सहा वाजता दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात प्रसिद्ध गायक राहूलदेव कदम यांच्या आवाजात भीम पहाट हा सुमधुर भीम गीत गायन व अन्य कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत जयंती साजरी करण्याच्या उद्देशाने लातुरात फ्री व्हॉइस ग्रुपच्या वतीने भीम फेस्टिवल साजरा केला जात असून या उपक्रमास लातूरकरांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून उद्या बुधवार १७ रोजी पहाटे सहा वाजता दयानंद महाविद्यालयाच्या सभागृहात प्रसिद्ध गायक राहूल देव कदम यांचा




सुमधुर आवाजात भीम गीत गायनाचा भीम पहाट कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर आंबेडकरी कवी संमेलन, दुपारी एक वाजता आंबेडकरी दीर्घांक अभिवाचन, भव्य रिल्स, नृत्य स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यकर्माचा समारोप मान्यवरांच्या उपस्थितीत सायंकाळी पाच वाजता विजेत्यांना बक्षीस वितरण करून करण्यात येणार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित नाटक, रील, गीत गायन, नृत्य या स्पर्धा पाहण्यासाठी मोफत प्रवेश असणार असून यास लातूरकरांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### महामार्ग मंत्रालयात मोठा भ्रष्टाचार: पवन खेरा यांचा गडकरी यांच्यावर निशाणा

नागपूर; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. एक लाख कोटींचे बॉण्ड बिना कॅबिनेट मंजुरीने काढण्यात आले. कॅगने भारतमाला परियोजना संदर्भात गैरप्रकारांवर बोट ठेवले. आमच्या वेळी कॅगचा अहवाल यायचा तेव्हा हेच लोक रस्त्यावर उतरत आंदोलन करायचे, संसदेत गदारोळ व्हायचा, मात्र आज कॅग रिपोर्टकडे दुर्लक्ष केले जात आहे. असे काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेरा यांनी सोमवारी (दि.१५) पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. आमच्या काळात चाळीस हजार कोटी रुपये असलेले राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कर्ज आज केवळ व्याज ३८ हजार कोटी रुपये झाले आहे.

# विश्वहिंदू परिषद , बजरंग दल ,सामाजिक समरसता मंच लोकसेवा मंडळ लातूरच्या वतीने शरबत वाटप

लातूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीचे औचित्य साधून विश्वहिंदू परिषद , बजरंग दल ,सामाजिक समरसता मंच लोकसेवा मंडळ लातूरच्या वतीने डॉ. आंबेडकरांना विनम्र अभिवादन करण्यात आले . जयंतीदिनांनिमित्त नागरिकांना शरबताचेही वाटप करण्यात आले. प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून अशा प्रकारचा सामाजिक उपक्रम राबविण्यात येतो. रविवारी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर घोष मानवंदना देण्यात आली. त्यानंतर पुष्पमाला अर्पण करून विभाग संघ चालक सीए संजय अग्रवाल, जिल्हा संघचालक प्रा. राजेश्वर बेंबडे, शहर संघ चालक उमाकांत मद्रेवार , जिल्हा सहकार्यवाह सागर कारंजे, शहर कार्यवाह किशोर पवार, परमानंद जोशी, विश्व हिंदू परिषद विभाग सहमंत्री एड. गौरीशंकर कौळखेरे , रमण हजारे, गणेश छत्रे, बजरंग दल महानगर संयोजक सूर्यासिंग राजपूत, मातृशक्ती महानगर संयोजिका तृप्तीताई अंदुरे , सामाजिक समरसता विभाग संयोजक शाम बलुतकर , लक्ष्मीकांत कुलकर्णी, डॉ. संतोष जमदाडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सेवा विभाग शहर प्रमुख हरीश उपाध्याय, लोकसेवा मंडळ अध्यक्ष एड. विश्वनाथ जाधव, पर्यावरण गतिविधी जिल्हा प्रमुख अनिल वारद आदिंनी बाबासाहेबांना विनम्र अभिवादन केले. आंबेडकर पार्क याठिकाणी नागरिकांना शरबताचे वाटप करण्यात आले. तसेच आंबेडकर जयंती पार पडल्यानंतर पार्क परिसरात झालेला कचरा पर्यावरण गतिविधी व विश्वहिंदू परिषद , बजरंग दलाच्या पदाधिकारी - कार्यकर्त्यांनी साफ केला.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE